This question paper consists of 37 questions and 8 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 8 छापील पाने आहेत.

Roll No. अनुक्रमांक | | | | | | | | | | | | |

Code No. 54/S/A/M
कोड नं.

Set - A

# MARATHI

## (मराठी)

## (204)

Day and Date of Examination
(परीक्षेचा दिवस आणि तारीख) ______________________

Signature of Invigilators 1. ______________________
(निरीक्षकाची सही)
2. ______________________

सामान्य अनुदेश :

1 परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.

2 कृपाकरून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रूपात असावी.

3 बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमधे योग्य उत्तर लिहायचे आहे.

4 बहुपर्यायी प्रश्नांचे सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.

5 उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.

6 आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेचा कोड संख्या **54/S/A/M-A** लिहावेत.

# MARATHI

## (मराठी)

## (204)

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 100

**निर्देश :**

**1** **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

**2** **सर्व** प्रश्न लक्षपूर्वक वाचून मगच प्रश्नाचे उत्तर द्यावे.

**3** प्रश्न **1** ते **11** पर्यंत प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून लिहावा.

---

**1** 'झेल्या' कुठल्या नावाचा अपभ्रंश आहे ? **1**

(A) जालंदर (B) जमाल

(C) जगदीश (D) जालम

**2** पुढे दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय ओळखा. **1**

(A) सूशिक्षित (B) सुशिक्षित

(C) सूशीक्षित (D) सुशिक्षीत

**3** खालील काव्यपंक्तीतील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून लिहा. **1**

'जगतास..........देईल.'

(A) स्वातंत्र्य (B) क्रांती

(C) शांती (D) आनंद

**4** टिळकांच्या मते आपण मराठी भाषेचा स्वीकार केला आहे कारण **1**

(A) ती इंग्रजी पेक्षा चांगली आहे.

(B) मराठी भाषा आपल्याला आवडते.

(C) ती आपल्याला जन्माबरोबर प्राप्त झाली आहे.

(D) मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या खूप आहे.

5 पुढीलपैकी कोणत्या वाक्यात सर्वनाम आले आहे ? 1

(A) त्याला वाईट वाटले.
(B) मयूर आठवीत गेला.
(C) शैलेश तबला वाजवतो.
(D) नंदिता कॉलेजमध्ये जाते.

6 नागूला कशाचा दांडगा अनुभव होता ? 1

(A) झोपेचा
(B) खेळायचा
(C) म्हशीचे दूध काढायचा
(D) स्वयंपाकाचा

7 प्रत्येक जण पिल्लाशी कसे बोलत असे ? 1

(A) टोचून
(B) रागावून
(C) धिक्कारून
(D) तुच्छतेने

8 पुढीलपैकी शुद्ध शब्द ओळखा. 1

(A) उद्धरणी
(B) उधरणी
(C) उदधरणी
(D) उध्दरणी

9 कन्याकुमारी भारताच्या कोणत्या दिशेला आहे ? 1

(A) उत्तर
(B) दक्षिण
(C) पूर्व
(D) पश्चिम

10 'ने मजसी ने परत मातृभूमिला' असे कवीने कुणास उद्देशून म्हटले आहे ? 1

(A) शिपायाला
(B) मित्राला
(C) सागराला
(D) ईश्वराला

11 पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा. 1

'आकाशात <u>शुभ्र</u> बगळ्यांची माळ दिसली.'

(A) सर्वनाम (B) विशेषण

(C) नाम (D) यापैकी काही नाही

12 नवीन मास्तरांविषयी झेल्याने आधी कोणते मत बनविले होते ? 1

13 भाषा विकासासाठी लो. टिळक तरूणांकडून कोणत्या अपेक्षा करतात ? 1

14 'बलसागर भारत होवो' या कवितेत कवीने कोणती आकांक्षा व्यक्त केली आहे ? 1

15 कुणाच्या वदनी श्रावण महिन्याचे गीत वाचून घ्यावे असे बालकवी म्हणतात ? 1

16 डोंबारी कुणाला म्हणतात ? 1

17 कवी सागराला नदीची शपथ कां घालतो ? 1

18 खालील वाक्यातील क्रियापद ओळखा व त्याचा काळ कोणता ते सांगा – 1

(i) ललिता पत्र लिहीत होती.

(ii) पेट्रोलची किंमत उद्या वाढेल.

19 पुढे दिलेल्या शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. 1

(i) चहाड्या करणारा.

(ii) जिवाला जीव देणारा.

20 झेल्याला आपली आठवण म्हणून मास्तरांनी कोणत्या वस्तू दिल्या ? 1

21 खालीलपैकी कुठल्या वाक्यात उभयान्वयी अव्यय वापरले आहे ? 1

(A) त्याने अभ्यास केला नाही, तो नापास झाला.

(B) त्याने अभ्यास कसातरी संपवला.

(C) त्याने खूप अभ्यास केला म्हणून तो पास झाला.

(D) त्याने अभ्यास केला तो पास झाला.

22 पुढीलपैकी एका म्हणीचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. 1

(i) इकडे आड तिकडे विहीर

(ii) अति तेथे माती.

23 (अ) खालील शब्दांचे दोन–दोन समानार्थी शब्द लिहा : 2

(i) चंद्र

(ii) मित्र

(ब) खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा : 2

(i) उचित (ii) इष्ट

(iii) माहेर (iv) सुंदर

24 खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :

पॅरिस, न्यूयॉर्क, रोम, लंडन ही जगप्रसिद्ध शहरे. ती सारी मी अनेकवार पाहिली, पण त्या सर्वांना मागे टाकणारे शहर आणि त्या त्या देशांना हरवणारा देश आता पूर्वेस उदयाला आला आहे. या देशाचे नावच आहे 'उगवत्या सूर्याचा देश – जपान, त्या शहराचे नाव आहे टोकिओ. ज्या साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नाही, असे ब्रिटिश साम्राज्याचे एके काळी वर्णन केले जात असे. आज हेच वर्णन जपानला यथार्थतेने लागू पडते. फरक एवढाच की जपानच्या ताब्यात परकीय प्रदेशाचा एकही चौरस मैल नाही आणि तरीही जपानच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही. भौगोलिक परिस्थिती सर्वस्वी प्रतिकूल असूनही जपानने अनेक क्षेत्रांत जगातील क्रमांक एकचे स्थान पटकावले आहे. हे लक्षात घेतले तर या लोकांचे विशेषच कौतुक वाटते. अमेरिकेने पन्नास वर्षे जगात क्रमांक एकचे संपन्न राष्ट्र म्हणून दिमाख दाखविला, पण भौगोलिक परिस्थिती अमेरिकेला इतकी अनुकूल आहे की अमेरिकेच्या या कर्तबगारिचे तसे आश्चर्य वाटत नाही.'

– रमेश मंत्री

प्रश्न :

(i) जगप्रसिद्ध शहरे कोणती ? 1

(ii) 'उगवत्या सूर्याचा देश' कोणत्या देशाला म्हटले आहे ? 1

(iii) अमेरिकेच्या तुलनेत जपानचे विशेष कौतुक कां वाटते ? 2

25 खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा –

संतांचा अनुभव संतचि जाणती । येर ते हासती अभाविक ॥१॥

नामाचा प्रताप प्रल्हादचि जाणे । जन्ममरण येणे खुंटियेले ॥२॥

सेवेचा प्रकार जाणे हनुमंत । तेणे सीताकांत सुखी केला ॥३॥

सख्यत्त्वे पूर्णता अर्जुना बाणली । ऐक्य रूपे चाली मिरविला ॥४॥

चोखा म्हणे ऐसा आहे श्रेष्ठाचार । तेथे मी पामर काय बाणू ॥५॥

**प्रश्न :**

(i) नामस्मरणाने प्रल्हादास काय मिळाले ? 1

(ii) सामान्य माणसे संतांना कां हसतात ? 1

(iii) संत चोखामेळा यांनी संतांच्या श्रेष्ठ आचरणाचे स्वरूप कोणत्या उदाहरणातूत स्पष्ट केले आहे ? 2

26 खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा –

(अ) केशवने कोलकाता येथे शिक्षण घेण्याचे कां ठरविले ? 2

(ब) आचार्य विनोबा भावे यांच्या मते समाजात स्त्री पुरुष भेदभाव कसा केला जातो ? 2

27 (अ) महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची कोणकोणती दुःखे सांगितली आहेत ? 3

(ब) डॉ. अब्दुल कलाम कोणते आवाहन करतात ? 3

28 (अ) डोंबारी कसे जीवन जगतात ? 2

(ब) पावसाच्या धारा बरसल्यानंतर सृष्टीतील कोणती रूपे कविला मोहित करतात ? 2

29 ससंदर्भ स्पष्टीकरण करा –

(अ) ''बलाकमाला उडता भासे कल्पसुमांचि माळची ते ।
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते ॥'' 3

(ब) कवयित्री या देशाच्या मातीची महती कशी सांगतात ? 3

30 (अ) 'कापणी' या कवितेत, सोनं आणिमति पदरात येते असे घर धनीण कां म्हणते ? 3

(ब) भाषेच्या विकासासाठी सुशिक्षितांनी कोणती कामे केली पाहिजेत ? असे टिळकांना वाटते ? पाठाचे नाव लिहा. 3

31 (अ) मास्तरांचा निरोप घेतांना झेल्याची मनःस्थिती कशी झाली होती ? 3

(ब) आपल्या संघटनेला चांगले बळ मिळावे, संघटनेचा विस्तार व्हावा म्हणून डॉ. हेडगेवार यांनी कोणकोणत्या गोष्टी केल्या ? 3

32 परीक्षा जवळ आलेली आहे, परीक्षेची तयारी पूर्ण झाली नाही, यासंबंधी तुमच्या मित्राशी झालेला संवाद 8 ते 10 वाक्यात लिहा. 4

33 खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : (शब्द मर्यादा 200) 10

(i) माझा आवडता ऋतु

(ii) इंटरनेट – एकशिक्षणाचे माध्यम

(iii) अति तेथे माती

(iv) निसर्ग – आपला मित्र.

34 तुमच्या पाठ्यपुस्तकांतील सर्वात अधिक कोणता पाठ तुम्हाला आवडला ? कां आवडला ? पाठाचे व लेखकांचे नाव लिहा. 4

35 इयत्ता नववीत प्रथम क्रमांकाने पास झालेल्या तुमच्या बहिणीला अभिनंदनपर पत्र लिहा. 8

किंवा

तुमच्या शाळेतील क्रिडाविभागासाठी आवश्यक असलेल्या क्रिडासाहित्याची मागणी करणारे पत्र क्रिडासाहित्यभांडारास लिहा.

36 पुढील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दात लिहा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. 4

लहानपणापासून मला पक्ष्यांविषयी खूप आकर्षण वाटे. अगदी लहानपणीही मी अंगणांत येणाऱ्या पक्षांकडे एकटक पाहत बसत असे आणि जरा मोठा झाल्यावर, वाचता येऊ लागल्यावर मी पक्षांविषयी खूप माहिती गोळा करू लागलो. तेव्हा मला पक्षी जीवनाची खूप ओळख झाली; पण त्याचबरोबर त्यांच्यातील विविधताही कळली. माझा हा छंद ओळखून माझ्या बाबांनी मला एक छान दुर्बीण आणून दिली. त्यामुळे उंच उडणाऱ्या पक्ष्यांचेही मी चांगले निरीक्षण करू शकतो.

37 एका धान्य व्यापाऱ्याच्या गोदामात निरनिराळ्या धान्याची पोती रचून ठेवली होती, त्यात एकूण पोती 2000 होती, त्यातील 1000 पोती गव्हाची, 500 पोती तांदळाची, 200 पोती हरभऱ्याची तर 300 पोती तुरीच्या डाळीची; प्रत्येक धान्याची टक्केवारी वर्तुळालेखाच्या साहाय्याने दाखवा. 4